# तालुका नमुने- महसुली नोंदवह्या

महसूल अभिलेख पध्दतीत तलाठी यांच्याकडे प्रत्येक गावासाठी गाव नमुने एक ते एकवीस ठेवले जातात. याच गाव नमुने एक ते एकवीसवर आधारीत सोळा 'तालुका नमुने-महसुली नोंदवह्या' प्रत्येक तालुक्यातही ठेवले जातात. 'तालुका नमुने-महसुली नोंदवह्या' चे चार प्रकार आहेत.

१. अधिकार अभिलेखाची स्थिती दर्शविणाऱ्या आकडेवारीवर आधारीत.

२. गाव/सजानिहाय महसूल लेख्यांवर आधारीत.

३. तालुका पातळीवरील आकडेवारीवर आधारीत.

४. तालुका पातळीवरील व्यवहारांवर आधारीत.

एकत्रिकृत गाव महसुली लेख्यांवर नियंत्रण ठेवणे आणि सामान्य आणि सुयोग्य प्रशासनासाठी आकडेवारी संकलित करणे हा 'तालुका नमुने-महसुली नोंदवह्यांचा' उद्देश आहे.

'तालुका नमुने-महसुली नोंदवह्या' मुळे गाव पातळीवरील अभिलेखाची तसेच गाव महसुलीची स्थिती दर्शवणारी आकडेवारी संकलित होते. या 'तालुका नमुने-महसुली नोंदवह्या' च्या आधारावर 'जिल्हा नमुने' बनविले जातात.

| अ.क्र. | तालुका नमुना | तपशील | जतन कालावधी आणि अभिलेख वर्ग | तत्सम गाव नमुना |
|---|---|---|---|---|
| १ | १ | जमिनींची नोंदवही | ३० वर्ष (जमाबंदीची मुदत) वर्ग-ब | गाव नमुना १ चा गोषवारा |
| २ | १-अ | भोगवटादार वर्ग एक, दोन, सरकारी पट्टेदार व कुळांची नोंदवही | ३० वर्ष वर्ग-ब | गाव नमुना १-क व ८-अ |
| ३ | २ | अकृषिक महसुलाची नोंदवही | ३० वर्ष (जमाबंदीची मुदत) वर्ग-ब | गाव नमुना २ |
| ४ | ३ | दुमाला जमिनींची नोंदवही | कायम स्वरूपी वर्ग-अ | गाव नमुना ३ |
| ५ | ३-अ | सेवेतर रोख भत्त्याची नोंदवही- पेटा खातेवही | ५ वर्ष वर्ग-क | -- |
| ६ | ४ | संकीर्ण जमीन महसुलाची नोंदवही | वार्षिक-३० वर्ष वर्ग-ब | गाव नमुना ४ |
| ७ | ४-अ | सक्तीच्या लहान व मोठ्या उपाय योजनांची दुय्यम नोंदवही | वार्षिक-३० वर्ष वर्ग-ब | -- |
| ८ | ५ | तालुका जमाबंदी | वार्षिक-३० वर्ष वर्ग-ब | गाव नमुना ५ |
| ९ | ६ | हक्क नोंदणी गोषवारा | वार्षिक-५ वर्ष वर्ग-क | गाव नमुना ६ (दुय्यम नोंदवह्यांसह) आणि ७ |

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy Collector

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | ७ | तालुका ताळेबंद | वार्षिक-५ वर्ष<br>वर्ग-क | गाव नमुना ८-ब |
| ११ | ८ | लोकसंख्या, गुरे, शेतकी अवजारे नोंदवही | १० वर्ष<br>वर्ग-क-१ | गाव नमुना १३ |
| १२ | ९ | पाणीपुरवठा साधनांची नोंदवही | कायम स्वरूपी-५ वर्ष<br>वर्ग-क | गाव नमुना १४ |
| १३ | १० | मूल्य नोंदवही | वार्षिक-३० वर्ष<br>वर्ग-ब | -- |
| १४ | ११ | वेतन नोंदवही | वार्षिक-३० वर्ष<br>वर्ग-ब | -- |
| १५ | १२ | पर्जन्यमान नोंदवही | वार्षिक-५ वर्ष<br>वर्ग-क | -- |
| १६ | १३ | दैनिक भत्ता नोंदवही | कायम स्वरूपी-५ वर्ष<br>वर्ग-क | -- |
| १७ | १४ | स्थायी अग्रिम नोंदवही | कायम स्वरूपी-५ वर्ष<br>वर्ग-क | -- |
| १८ | १५ | तपासणी, शोध, नक्कल फी नोंदवही | वार्षिक-५ वर्ष<br>वर्ग-क | -- |
| १९ | १६ | तालुका आदर्श तक्ता | वार्षिक-५ वर्ष<br>वर्ग-क | -- |

तालुका नमुन्यांची थोडक्यात माहिती: *[उपरोक्त नोंदवह्यांबाबत सखोल माहिती महाराष्ट्र जमीन महसूल नियमपुस्तिका (खंड-पाच) मध्ये दिली आहे]*

● **तालुका नमुन्यांची थोडक्यात माहिती:** ***[महाराष्ट्र जमीन महसूल नियमपुस्तिका (खंड-पाच)]***

♦ **<u>तालुका नमुना-१: जमिनींची नोंदवही:</u>**

**हा नमुना तालुक्यातील महसुली लेख्यांचे आरंभ स्थान आहे. म.ज.म.अ. १९६६, कलम १०२ अन्वये जमीन महसुलाची जमाबंदी लागू केल्यानंतर, म.ज.म.अ. १९६६, कलम ८४ अन्वये तयार केलेल्या आकारणीच्या आधारे हा नमुना तालुक्यासाठी तयार केला जातो.**

**हा तालुका नमुना, सर्व गावातील गाव नमुना १ च्या गोषवाऱ्यावर आधारीत असतो. तालुक्यातील सर्व गाव नमुना १ च्या गोषवाऱ्यांची माहिती यात संकलित केली जाते.**

●

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

## तालुका नमुना-१
## जमिनींची नोंदवही

तालुका: जिल्हा:

| अ.क्र. | गाव | लागवडीसाठी उपलब्ध जमिनीचे क्षेत्र | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | आकारी | | | | | |
| | | भोगवट्याची बिन दुमाला | | | बिन भोगवट्याची | विशेष करारान्वये महसूल माफ किंवा कम महसुली जमीन | दुमाला |
| | | भोगवटादार वर्ग एक | भोगवटादार वर्ग दोन | सरकारी पट्टेदार | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

| आकारी | | बिन आकारी | | लागवडी करीता एकूण क्षेत्र (९ ते १२ ची बेरीज) |
|---|---|---|---|---|
| एकूण आकारणी केलेले (३ ते ८ ची बेरीज) | बिन भोगवट्याची | विशेष वापरासाठी नेमून दिलेली जमीन (उदा. कृषी क्षेत्र, भात पैदास केंद्र इ.) | एकूण बिन आकारी (१०+११) | |
| ९ | १० | ११ | १२ | १३ |
| | | | | |

| लागवडीसाठी उपलब्ध नसलेले जमिनीचे क्षेत्र | | | | |
|---|---|---|---|---|
| लागवड अयोग्य | | | सार्वजनिक किंवा विशेष वापरासाठी नेमून दिलेली | |
| पोट खराबा | नद्या व नाले | एकूण लागवड अयोग्य (१४ + १५) | वन | कुरण |
| १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| | | | | |

| सार्वजनिक किंवा विशेष वापरासाठी नेमून दिलेली | | | | |
|---|---|---|---|---|
| विनामूल्य गायराने, गुरांचे तळ | गावठाण | तलाव | स्मशानभूमि | रेल्वे |
| १९ | २० | २१ | २२ | २३ |
| | | | | |
| रस्ते, पाणी पुरवठ्याची साधने इत्यादी | रस्ते व वाटा | कटक (कॉन्टन्मेंट) क्षेत्रातील | शाळा | धर्म शाळा |

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

| | | | | |
|---|---|---|---|---|
| करीता दिलेला पोट खराबा | | जमिनी (सैनिकी छावणी, गोळीबार क्षेत्र इत्यादी) साठी दिलेले क्षेत्र | | |
| २४ | २५ | २६ | २७ | २८ |
| | | | | |

| सार्वजनिक किंवा विशेष वापरासाठी नेमून दिलेल्या जमिनीची बेरीज (१७ ते २८ ची बेरीज) | वर्ग ७ इनामाच्या जमिनीसह अकृषिक वापराकरीता प्रदान केलेले किंवा पट्ट्याने दिलेले (वापराचा प्रकार बदलल्यानंतर भूमापन क्रमांक) | लागवडीसाठी उपलब्ध नसलेली एकूण जमीन (१६ + २९ + ३० यांची बेरीज) | गावाचे एकूण क्षेत्र (१३ व ३१ यांची बेरीज) | गावाची एकूण आकारणी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| २९ | ३० | ३१ | ३२ | ३३ | ३४ |
| | | | | | |
| जमाबंदी महसूल सहायक, तालुका........., जिल्हा.....<br>स्वाक्षरी- | | तहसिलदार, तालुका........., जिल्हा.....<br>स्वाक्षरी- | | | |

♦ <u>तालुका नमुना-१-अ: भोगवटादार वर्ग एक, दोन, सरकारी पट्टेदार व कुळांची नोंदवही:</u>
**प्रत्येक गावातील भोगवटादार वर्ग एक, भोगवटादार वर्ग दोन, सरकारी पट्टेदार आणि कुळ म्हणून जमीन धारण करणाऱ्यांची संख्या, क्षेत्र, खातेदार स्वत: कसत असलेले क्षेत्र व कुळाकडून कसून घेत असलेले क्षेत्र याची माहिती यात नोंदवली जाते. सर्व गावातील गाव नमुना १-क (सुधारीत) आणि गाव नमुना ८-अ मधून सदर माहिती संकलित केली जाते.**

| तालुका नमुना-१-अ<br>भोगवटादार वर्ग एक, दोन, सरकारी पट्टेदार व कुळांची नोंदवही | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| तालुका: | | | | जिल्हा: | | |
| अ. क्र. | वर्ग | संख्या | क्षेत्र | स्तंभ ४ पैकी स्व लागवडीखालील क्षेत्र | स्तंभ ४ पैकी कुळांना पट्ट्याने दिलेले क्षेत्र | शेरा |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | भोगवटादार वर्ग एक | | | | | |
| २ | भोगवटादार वर्ग दोन | | | | | |
| ३ | सरकारी पट्टेदार | | | | | |
| ४ | कुळे | | | | | |

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

| जमाबंदी महसूल सहायक, तालुका........., जिल्हा.....<br>स्वाक्षरी- | तहसिलदार, तालुका........., जिल्हा.....<br>स्वाक्षरी- |
|---|---|

♦ <u>तालुका नमुना-२: अकृषिक महसुलाची नोंदवही:</u>

या नोंदवहीत तालुक्यातील सर्व अकृषिक जमिनींवरील नियत जमीन महसुलाचा हिशोब ठेवला जातो. तालुक्यातील सर्व अकृषिक महसुलाची नोंद यात केली जाते. महाराष्ट्र जमीन महसूल (महसूल भूमापने व भूमापन क्रमांकांचे उपविभाग) नियम, १९६९ मधील नियम २२ अन्वये हा नमुना तयार करण्यात व ठेवण्यात येतो.

जिल्हाधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसिलदार यांच्याकडून बिनशेती आदेश प्रथम तहसिलदार कार्यालयात नोंदविले जातात. तहसिलदार कार्यालयाने सर्वप्रथम अशा बिनशेती आदेशाची नोंद तालुका नमुना २ मध्ये नोंदवावी. यातील नोंदींचा अनुक्रमांक, सदर बिनशेती आदेशावर नमुद करुन हा आदेश संबंधीत तलाठीकडे पाठवावा. तलाठ्यांनी तहसिलदार कार्यालयाकडून, तालुका नमुना २ मधील नोंदींचा अनुक्रमांक असलेल्या आदेशाचीच नोंद फेरफार सदरी नोंदवावी. तालुका नमुना २ व सर्व गाव नमुना २ ची माहिती सारखी असावी. हा नमुना वेळोवेळी अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे.

तालुका नमुना-२
अकृषिक महसुलाची नोंदवही

गाव: तालुका: जिल्हा:

| अ. क्र | जमिनीचे वर्णन (भूमापन क्र.) | भूक्षेत्र | अकृषिक परवानगी / भूप्रदानाचे स्वरुप व अटी तसेच ज्या अन्वये जमीन प्रदान करण्यात आली किंवा अकृषिक परवानगी देण्यात आली ते महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाचे कलम व त्याखालील | भोगवटा हक्काची किंमत (असल्यास) | वार्षिक महसूल (आकारणी/ भाडे) | महसुलाचा कालावधी (आकारणी/भाडे) | प्राधिकार | शेरा (तहसिलदारची सही) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | नियम | | | | | | |
| | | | | | | पासून (दिनांक) | पर्यंत (दिनांक) | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७-अ | ७-ब | ८ | ९ |
| | | | | | | | | | |

जमाबंदी महसूल सहायक, तालुका........., जिल्हा..... स्वाक्षरी-

तहसिलदार, तालुका........., जिल्हा..... स्वाक्षरी-

### ♦ तालुका नमुना-३: दुमाला जमिनींची/इनाम जमिनींची नोंदवही:

या नोंदवहीत तालुक्यातील सर्व गावातील कृषिक व अकृषिक दुमाला जमिनींवरील नियत जमीन महसुलाचा हिशोब ठेवला जातो. जमिनींची दिलेली पूर्णत: किंवा अंशत: सारा माफीची नोंद यात घेतली जाते. इनाम वर्ग-७ च्या सर्व प्रकरणांमध्ये वसुलीयोग्य आकारणीच्या रकमेवर स्थानिक उपकर आकारला जातो आणि ज्या जमिनींच्या बाबतीत आकारणी करण्यात येत नाही तिथे स्थानिक उपकर आकारला जात नाही हे लक्षात ठेवावे. तालुक्यातील सर्व गाव नमुना ३ ची माहिती यात संकलित केली जाते.

प्रत्येक वर्षाच्या शेवटी, या नमुन्यातील स्तंभ ३ ते ६ ची गाव निहाय बेरीज करून नंतर तालुक्याची बेरीज केली जाते. गाव नमुना दोनच्या भाग ५ च्या गोषवाऱ्याबरोबर तसेच संबंधित गावाच्या गाव नमुना तीन बरोबर याचा मेळ घेण्यात यावा. इनाम जमिनीत होणारे बदल व नवीन इनामे अंतर्भूत करून हा नमुना अद्ययावत ठेवण्यात यावा.

तालुका नमुना-३
दुमाला जमिनींची/इनाम जमिनींची नोंदवही

गाव: तालुका: जिल्हा:

| अ.क्र. | गाव | निव्वळ लागवडीयोग्य क्षेत्र, रक्कम किंवा नुकसान | शासनाला देय असलेली रक्कम | दुमालादाराकडील शिल्लक | फेरबदलाचा तपशील | फेरबदल करण्याचा प्राधिकार | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

जमाबंदी महसूल सहायक, तालुका........., जिल्हा..... स्वाक्षरी-

तहसिलदार, तालुका........., जिल्हा..... स्वाक्षरी-

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

## ♦ तालुका नमुना-३-अ: सेवेतर रोख भत्त्याची नोंदवही-पेटा खातेवही:

हा वार्षिक नमुना असून विशेषत: धार्मिक कारणांसाठी दिला जाणारा रोख भत्ता यात नोंदवला जात होता. यात रक्कम, रकमेचे स्वरुप, रक्कम घेणाऱ्याचे नाव नमूद असे. वर्षाच्या शेवटी गोषवारा काढला जात असे. हा नमुना सध्या प्रचलित नसला तरीही निरंक नमुना ठेवणे अपेक्षित आहे.

| तालुका नमुना-३-अ<br>सेवेतर रोख भत्त्याची नोंदवही-पेटा खातेवही | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| गाव: | | | तालुका: | | जिल्हा: | |
| छापील मंजूर सूचीतील क्रमांक | दुमाल्याचा वर्ग | मंजूर वार्षिक रक्कम | पदधारक व आवश्यक असल्यास त्याचा पत्ता | फेरबदला करिता प्राधिकार | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | | |
| | | | | | | |
| येणे थकबाकी | | प्रदानाचा कालावधी | | | | शेरा |
| वर्ष व कालावधी | रक्कम | वर्ष | दिनांक | कालावधी | रक्कम | टिपा |
| ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | | | | | | |
| जमाबंदी महसूल सहायक, तालुका........., जिल्हा.....<br>स्वाक्षरी- | | | तहसिलदार, तालुका..., जिल्हा.....<br>स्वाक्षरी- | | | |

## ♦ तालुका नमुना-४: संकीर्ण महसुलाच्या हिशोबाची नोंदवही:

हा वार्षिक नमुना असून या नोंदवहीत तालुक्यातील संकीर्ण महसुलाच्या हिशोबाची नोंद असते. संकीर्ण महसुलाची पुरेशी वसुली होत आहे याची खात्री करणे हे तहसिलदारचे कर्तव्य आहे. तालुक्यातील सर्व गाव नमुना ४ ची माहिती यात संकलित केली जाते.

संकीर्ण महसूल आकारण्याचा आदेश मंजूर झाल्याबरोबर सर्वप्रथम अशा संकीर्ण महसूल आकारणी आदेशाची नोंद तालुका नमुना ४ मध्ये नोंदवावी. यातील नोंदींचा अनुक्रमांक, सदर संकीर्ण महसूल आकारणी आदेशावर नमुद करुन हा आदेश संबंधीत तलाठीकडे गाव नमुना चारमध्ये नोंद घेण्यासाठी पाठवावा.

विलंब शुल्काचा आदेश काढणाऱ्या/आकारणाऱ्या प्रत्येक अधिकाऱ्याने विलंब शुल्काच्या आदेशाची/आकारणीची प्रत तहसिलदारकडे पाठविणे आणि तहसिलदारने त्याची नोंद तालुका नमुना ४ मध्ये नोंदविणे अपेक्षीत आहे. अशा नोंदींचा अनुक्रमांक नमुद करुन तलाठ्याने गाव नमुना चारमध्ये नोंद घ्यावी.

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

| तालुका नमुना-४<br>संकीर्ण महसुलाच्या हिशोबाची नोंदवही | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| गाव: | | | तालुका: | जिल्हा: | |
| अ.क्र. | गाव | प्रकरण क्रमांक | खाते क्रमांक | जिल्हा परिषद उपकर | ग्रामपंचायत उपकर |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |
| उपकर आकारणी योग्य (म.ज. म. नियमपुस्तिका खंड चार मधील एक ते तेरा बाबी) | उपकर मुक्त (म.ज. म. नियमपुस्तिका खंड चार मधील चौदा ते तेवीस बाबी) | शेरा | जमाबंदी महसूल सहायक, तालुका........., जिल्हा....<br>स्वाक्षरी-.<br>तहसिलदार, तालुका........., जिल्हा.....<br>स्वाक्षरी- | | |
| ७ | ८ | ९ | | | |
| | | | | | |

♦ <u>तालुका नमुना-४-अ: सक्तीच्या लहान व मोठ्या उपाय योजनांची दुय्यम नोंदवही:</u>

ही दुय्यम नोंदवही असून आयकर, उत्पादन शूल्क, महसूल वसुली प्रमाणपत्र किंवा शासनाची अन्य मागणी यांच्या वसुलीसाठी ज्या सक्तीच्या लहान व मोठ्या उपाय योजना केल्या जातात, त्याची नोंद यात केली जाते. यामुळे अशा उपाय योजनांमध्ये अंतर्भूत असलेल्या संकिर्ण जमीन महसुलावर (नोटीस, फी, दंड, विक्रीचा खर्च तसेच अशा उपाय योजनांवर तहसिलदारचे नियंत्रण राहते.

| तालुका नमुना-४-अ<br>सक्तीच्या लहान व मोठ्या उपाय योजनांची दुय्यम नोंदवही | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| गाव: | | | | तालुका: | | जिल्हा: | |
| अ.क्र. | दिनांक | प्रकरणांची संख्या | नाव | थकबाकी | क्षेत्र | आकारणी | धारणाधिकार |
| | | | | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |
| सक्तीची लहान उपाय योजना | | | | | | | |
| नोटीस (कलम १७८) | | | एकचतुर्थांश दंड (कलम १७४) | | | | |
| दिलेल्या नोटीसची | थकीत रक्कम | वसुलीयोग्य फी | भोगवटादारांची संख्या | नाव | थकीत रक्कम | शास्ती | |

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

| संख्या | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| | | | | | | |

| सक्तीची लहान उपाय योजना | | | | |
|---|---|---|---|---|
| जंगम मालमत्ता अडकवून ठेवणे (कलम १८०) | | | | |
| भोगवटादारांची संख्या | नाव | थकीत रक्कम | विक्रीचे उत्पन्न | खर्च |
| १६ | १७ | १८ | १९ | २० |
| | | | | |

| सक्तीची मोठी उपाय योजना | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| जप्त केलेल्या धारण जमिनीची विक्री (कलम १७९) | | इतर स्थावर मालमत्तेची विक्री (कलम १८१) | | कैद व कारावास (कलम १८३) | शासनाने ताब्यात घेतलेली (कलमे १८२ व १८७) | | शेरा |
| उत्पन्न | खर्च | उत्पन्न | खर्च | | पासून | पर्यंत | |
| २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ |
| | | | | | | | |
| जमाबंदी महसूल सहायक, तालुका........., जिल्हा..... स्वाक्षरी- | | | | | तहसिलदार, तालुका........., जिल्हा..... स्वाक्षरी- | | |

♦ <u>तालुका नमुना-५: तालुका जमाबंदी नोंदवही:</u>

या नमुन्यामध्ये तालुक्यातील क्षेत्र व महसूल यांची आकडेवारी तसेच एकत्रीकृत जमीन महसुलाच्या एकूण बेरजेसह निव्वळ वाढ व घट आणि महसूल प्राप्त करून देणारी क्षेत्रे आणि नियत महसुलात झालेला बदल, महसुलात झालेली वाढ किंवा घट यांची माहिती मिळते. या प्रयोजनार्थ प्रत्येक गावात, गाव नमुना पाच अचूक तयार करून त्याची एक प्रत तहसील कार्यालयात पाठविणे आवश्यक असेल.

हा नमुना गाव नमुना ७ सोबत पडताळून तपासावा. या नमुन्याची पडताळणी करून तहसिलदारने यावर स्वाक्षरी करावी आणि याची एक प्रत जिल्हाधिकारी कार्यालयाला सादर करावी.

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

| तालुका नमुना-५<br>तालुका जमाबंदी नोंदवही | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| गाव: | | | तालुका: | | | जिल्हा: | | | | |
| अ.क्र. | मागील वर्ष | | चालू वर्ष | | घट | | वाढ | | घट व वाढ यांची कारणे | शेरा |
| | क्षेत्र | आकारणी | क्षेत्र | आकारणी | क्षेत्र | आकारणी | क्षेत्र | आकारणी | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |
| जमाबंदी महसूल सहायक, तालुका........., जिल्हा.....<br>स्वाक्षरी- | | | | | | तहसिलदार, तालुका........., जिल्हा.....<br>स्वाक्षरी- | | | | |

♦ <u>तालुका नमुना-६: हक्क नोंदणीचा गोषवारा:</u>

गाव पातळीवरील सर्व अधिकार अभिलेखाचा/हक्क नोंदणीचा गोषवारा असलेला हा वार्षिक नमुना आहे. या नमुन्यातुन केवळ महत्त्वाची आकडेवारीच उपलब्ध होते असे नाही तर त्यामुळे वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यांना गावे आणि तालुके यामधील कामावर प्रभावी नियंत्रण ठेवणे शक्य होते. हा गाव नमुना सहा व त्यातील दुय्यम नोंदवह्या तसेच गाव नमुना ७ वर आधारलेला आहे.

सध्या जरी संगणकीकरणाच्या माध्यमातून फेरफार नोंदी घेण्यात येत असल्या तरीही फेरफार नोंदी, तक्रार नोंदी, वारस नोंदी यांवर नियंत्रण राहावे आणि त्याबाबत वारंवार आढावा घेता यावा म्हणून हा नमुना आजही तितकाच प्रभावी आहे. या नमुन्याची पडताळणी करून तहसिलदारने यावर स्वाक्षरी करावी आणि याची एक प्रत जिल्हाधिकारी कार्यालयाला सादर करावी.

| तालुका नमुना-६<br>हक्क नोंदणीचा गोषवारा | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | तालुका: | | जिल्हा: | | |
| | | | फेरफार | | | |
| अ. क्र. | गाव | अधिकार अभिलेखातील नोंदींची एकूण संख्या | केलेल्या फेरफारांची संख्या | स्तंभ चार-अ मधील विवादग्रस्त फेरफारांची संख्या | प्रमाणित केलेल्या निर्विवाद फेरफारांची संख्या | प्रमाणीकरणा साठी प्रलंबित निर्विवाद फेरफारांची संख्या |
| १ | २ | ३ | ४-अ | ४-ब | ४-क | ४-ड |
| | | | | | | |

-

| स्तंभ ४-ब मधील वादग्रस्त | स्तंभ ४-ब मधील वादग्रस्त | प्रमाणित केलेल्या विवादग्रस्त | प्रमाणित करावयाच्या | अनुप्रमाणन व्हावयाच्या |
|---|---|---|---|---|

Dr. SANJAY KUNDETKAR Collector

| प्रकरणांपैकी निकाली काढलेल्या प्रकरणांची संख्या | प्रकरणांपैकी निकाली काढावयाच्या प्रकरणांची संख्या | फेरफारांपैकी निकाली काढलेल्या म्हणजेच स्तंभ ४-ई पैकी फेरफारांची संख्या | विवादग्रस्त फेरफारांपैकी निकाली काढलेल्या विवादग्रस्त फेरफारांची संख्या (४-ई) | फेरफाराची संख्या |
|---|---|---|---|---|
| ४-ई | ४-फ | ४-ग | ४-ह | ४-आय |
| | | | | |

-

| महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६, कलम १५२ खालील दंड | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| तपास लागलेल्या प्रकरणांची संख्या | निकालात काढलेल्या प्रकारांची संख्या | स्तंभ ५-ब मधील आकारलेल्या दंडाची रक्कम | स्तंभ ५-क मधील रक्कमेपैकी वसूल केलेली दंडाची रक्कम | दंडाची थकीत रक्कम (स्तंभ ५-क वजा ५-ड) | निकाली काढावयाच्या प्रकरणांची संख्या |
| ५-अ | ५-ब | ५-क | ५-ड | ५-ई | ५-फ |
| | | | | | |

-

| पोट हिस्से | | | | |
|---|---|---|---|---|
| मागील वर्षाच्या अखेरीस मोजणीचे काम शिल्लक राहिलेले पोटहिस्से | तयार केलेले नवीन पोटहिस्से | मोजणीसाठी असलेल्या पोट हिश्शांची एकूण संख्या (स्तंभ ६-अ अधिक ६-ब) | स्तंभ ६-क मधील मोजणी झालेल्या हिश्शांची एकूण संख्या | मोजणी व्हावयाच्या पोट हिश्श्याची एकूण संख्या (स्तंभ ६-क वजा ६-ड) |
| ६-अ | ६-ब | ६-क | ६-ड | ६-इ |
| | | | | |

| वारसा प्रकरणे | | | |
|---|---|---|---|
| वारसा प्रकरणाची एकूण संख्या | स्तंभ ७-अ मधील प्रकरणांपैकी निकालात काढलेल्या वारसा प्रकरणाची एकूण संख्या | निकालात काढावयाच्या वारसा प्रकरणांची संख्या (स्तंभ ७-अ वजा ७-ब) | शेरा |
| ७-अ | ७-ब | ७-क | ८ |
| | | | |
| जमाबंदी महसूल सहायक, तालुका........., जिल्हा..... स्वाक्षरी- | | तहसिलदार, तालुका........., जिल्हा..... स्वाक्षरी- | |

Dr. SANJAY KUNDETKAR, DY. Collector

## ♦ तालुका नमुना-७: तालुका ताळेबंद:

तालुका ताळेबंद हा वार्षिक नमुना असून यात तालुक्याची एकूण जमीन महसूलाची वार्षिक मागणी, वसूल, थकबाकी याबाबत माहिती असते. गाववार मागणी माहे जानेवारी अखेर तयार होत असल्यामुळे, तहसिलदारने गाव नमुने १ ते ३ आणि स्थानिक उपकरांसह संकिर्ण महसुलाची मागणी वजा करून, गाव नमुना ५ च्या प्रती फेब्रुवारी महिन्यात सर्व तलाठ्यांकडून मागवून घ्याव्यात व तालुका नमुना ७ संकलीत करण्याचे काम सुरू करावे.

संकिर्ण जमीन महसूल १५ जूनपर्यंत उद्‌भवण्याचा संभव असतो त्यामुळे तालुका नमुना ७, जून अखेरपर्यंत पुर्णत: संकलीत होतो. ३१ जुलै रोजी गाव नमुना ७-ब सोबत याचा मेळ घेऊन तहसिलदारने यावर स्वाक्षरी करावी आणि याचा गोषवारा जिल्हाधिकारी कार्यालयाला सादर करावा.

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

तालुका नमुना-७
तालुका ताळेबंद

तालुका: जिल्हा:

| अ. क्र. | गाव | क्षेत्र | | |
|---|---|---|---|---|
| | | बिन दुमाला जमीन | दुमाला जमीन | अकृषिक जमीन |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |

| दुमालादाराकडील शिल्लक | थकबाकी | | | |
|---|---|---|---|---|
| | जमीन महसूल वर्ष | रक्कम | स्थानिक उपकर वर्ष | रक्कम |
| ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | |

| चालू | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| बिन दुमाला | | दुमाला | | अकृषिक | | संकीर्ण जमीन महसूल | |
| ज. म. | स्था. उ. | ज. म. | स्था. उ. | ज. म. | स्था. उ. | ज. म. | स्था. उ. |
| ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| | | | | | | | |

| वसुलीची एकूण रक्कम | | | | चलन क्रमांक व दिनांक | वसूल झालेली रक्कम | | | | जादा वसुली अथवा पुढील वर्षाकरिता वसुली |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ज. म. | | स्था. उ. | | | ज. म. | | स्था. उ. | | |
| १९ | | २० | | २१ | २२ | | २३ | | २४ |
| वर्ष | रक्कम | वर्ष | रक्कम | | वर्ष | रक्कम | वर्ष | रक्कम | जमाबंदी महसूल सहायक,<br>तालुका........., जिल्हा.....<br>स्वाक्षरी- |
| | | | | | | | | | |
| थकबाकी | | | | | | | | | |

| अधिकृत | | अनधिकृत | | शेरा (सूट व सूट देण्याची कारणे येथे थोडक्यात नमूद करावीत) | तहसिलदार, तालुका........., जिल्हा..... स्वाक्षरी- |
|---|---|---|---|---|---|
| २५ | | २६ | | २७ | |
| वर्ष | रक्कम | वर्ष | रक्कम | | |
| | | | | | |

## ♦ तालुका नमुना-८: लोकसंख्या, गुरे, शेतकी अवजारे नोंदवही:

हा दशवार्षिक नमुना असून या नोंदवहीत तालुक्यातील गावनिहाय लोकसंख्या, गुरे, शेतकी अवजारे यांची माहिती संकलीत केली जाते. प्रत्येक गावातील ग्रामसेवकाकडून तसेच गाव नमुना १३ आणि १४ मधून यातील माहिती संकलित केली जाते.

तालुका नमुना-८

लोकसंख्या, गुरे, शेतकी अवजारे नोंदवही

तालुका: वर्ष:

| अ. क्र. | गाव | गावातील कुटुंबांची संख्या | घरांची संख्या | | | लोकसंख्या | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मोठी | मध्यम | लहान | स्त्रिया | पुरुष |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

| गुरे व चतुष्पाद प्राणी | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बैल | गाई | म्हशी | घोडे | घोड्या | मेंढ्या | बकरे | गाढवे | रेडे |
| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ |
| | | | | | | | | |

| शेतीची अवजारे | | तेल इंजिने | विद्युत पंप | ट्रॅक्टर | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| नांगर | गाड्या | | | | |
| १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ |
| | | | | | |

| जमाबंदी महसूल सहायक, तालुका........., जिल्हा..... स्वाक्षरी- | तहसिलदार, तालुका........., जिल्हा..... स्वाक्षरी- |
|---|---|

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

## ♦ तालुका नमुना-९: पाणीपुरवठा साधनांची नोंदवही:

**हा सततचा नमुना आहे. या नोंदवहीमध्ये तालुक्यातील सर्व गावातील पाणीपुरवठा साधनांची नोंद असते. सर्व गाव नमुना १४ मधून यात माहिती संकलीत केली जाते. दुष्काळी परिस्थितीत अनेक निर्णय घेण्यासाठी तहसिलदारला या नमुन्याचा उपयोग होतो.**

| तालुका नमुना-९<br>पाणीपुरवठा साधनांची नोंदवही | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तालुका: | | | | | | जिल्हा: | | |
| अ क्र | गाव | पाणी पुरवठ्याची साधने | जलसिंचनासाठी | | | | | |
| | | | पक्की | | | कच्ची | | |
| | | | अ.- प्रत्यक्ष वापरात असलेली | ब.- चालू स्थितीतील परंतु वापरात नसलेली | क.- सोडून दिलेली | अ.- प्रत्यक्ष वापरात असलेली | ब.- चालू स्थितीतील परंतु वापरात नसलेली | क.- सोडून दिलेली |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |

| माणसांना पिण्यासाठी परंतु जलसिंचनासाठी नसलेली | | गुरांकरिता, धुण्याकरिता व इतर प्रयोजनार्थ | | वापरात नसलेली (स्तंभ-५ व ९ यातील साधनांव्यतिरिक्त | | | | जमाबंदी महसूल सहायक,<br>तालुका........., जिल्हा.....<br>स्वाक्षरी- |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | नादुरुस्त झालेली | | इतर कारणे | | |
| पक्की | कच्ची | पक्की | कच्ची | पक्की | कच्ची | पक्की | कच्ची | |
| १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | तहसिलदार, तालुका.........,<br>जिल्हा.....<br>स्वाक्षरी- |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

♦ **तालुका नमुना-१०: मूल्य नोंदवही:**

हा वार्षिक नमुना आहे. तालुक्यातील अल्प उत्पन्न असणाऱ्या व्यक्ती सर्वसाधारणपणे ज्या वस्तू वापरतात, त्या वस्तुंची आणि त्यांच्या बाजार भावाची नोंद, स्थानिक चौकशी करून या नमुन्यात केली जाते. तालुक्यातील विनियमित बाजारपेठांमध्ये/महत्वाच्या बाजारपेठांमध्ये उपलब्ध असलेली तृणधान्ये, कडधान्ये, फळभाज्या, जनावरांकरिता वैरण, फळे, गुंगीकारक पदार्थ/द्रव्ये, मसाल्याचे पदार्थ, साखर उत्पादक पिके, गळित धान्ये, रंगद्रव्ये, तंतू पिके इत्यादींच्या घाऊक आणि किरकोळ सरासरी किंमतीची नोंद यात केली जाते. उपरोक्त वस्तूंच्या किंमतीतील चढ-उतारावर लक्ष व नियंत्रण ठेवणे हा या नमुन्याचा उद्देश आहे.

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

| तालुका नमुना-१०<br>मूल्य नोंदवही | | | |
|---|---|---|---|
| तालुका: | | जिल्हा: | |
| वस्तू सोबत जोडलेल्या सूचीत दर्शविल्या प्रमाणे | किरकोळ किंमत प्रत्येक किलोग्रॅमची/ नगाची/ क्विंटलची/ १०० गठ्ठ्यांची/ डझनाची किंवा प्रत्येक वस्तूची किंमत | घाऊक किंमत दर क्विंटलची/ १०० नगाची/ टनाची किंवा ग्रोसची किंमत (एक डझन =१२; १२ डझन =१ ग्रोस gross एकूण १४४) | शेरा |
| | दिनांक ....... रोजी सरासरी | दिनांक ....... रोजी सरासरी | |
| १ | २ | ३ | ४ |
| | | | |

ठिकाण: जमाबंदी महसूल सहायक, तालुका........., जिल्हा.....

स्वाक्षरी-

तहसिलदार, तालुका........., जिल्हा.....

दिनांक : स्वाक्षरी-

-

| वस्तुंची सूची | | | |
|---|---|---|---|
| वर्ग-१<br>तृणधान्य | वर्ग-२<br>कडधान्ये | (ब) | (क)<br>जनावरांकरिता वैरण |
| १. तायचूंग तांदूळ | २२. हरभरा | ४२. कोबी | ५०. विलायती गवत |
| २. अधिक उत्पादन | २३. मूग | ४३. वांगी | ५१. उन्हाळी ज्वारी |
| देणारे इतर प्रकारचे | २४. तूर | ४४. टोमॅटो | ५२. गिनी गवत |
| भात | २५. काळा हरभरा | ४५. मेथी | ५३. ओट |
| ३. साळ | २६. कुळीथ | ४६. भेंडी | ५४. फिल्ड व्हेंच |
| ४. स्वच्छ केलेला तांदूळ | २७. मसूर | ४७. खरबूज | |
| ५. मेक्सिकन गहू | २८. मटकी | ४८. कलिंगड | |
| ६. अधिक उत्पादन | २९. वाल किंवा पावटा | ४९. बीट | |
| देणाऱ्या जातीचा गहू | ३०. चवळी | | |
| ७. ज्वारी | ३१. वाटाणा | | |
| ८. संकरित ज्वारी | ३२. लाख | | |
| ९. बाजरी | ३३. बटाटा | | |
| १०.संकरित बाजरी | ३४. रताळे | | |
| ११. बार्ली | ३५. याम | | |
| १२. मका | ३६. सुरण | | |
| १३. संकरित मका | ३७. गाजर | | |
| १४. हरिक किंवा कोद्रा | ३८. नवलकोल | | |
| १५. नाचणी | ३९. मुळा | | |
| १६. राळे | ४०. कॉलीफ्लॉवर | | |

SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

| | | | |
|---|---|---|---|
| १७. कुटकी<br>१८. वरी<br>१९. सावा<br>२०. बंटी<br>२१. भादली | ४१. कांदे | | |

| (ड)<br>फळझाडे | वर्ग चार<br>औषधे व गुंगीकारक द्रव्ये | वर्ग पाच मसाल्याचे पदार्थ | वर्ग आठ<br>साखरेचे उत्पादन करणारी पिके | वर्ग आठ<br>गळित धान्ये |
|---|---|---|---|---|
| ५५. केळी<br>५६. आंबा<br>५७. लिंबू<br>५८. नारिंग<br>५९. मोसंबी<br>६०. पामेलो किंवा शॅडॉक<br>६१. डाळिंब<br>६२. सफरचंद<br>६३. पेरू<br>६४. सीताफळ<br>६५. अननस<br>६३. अंजीर<br>६७. फणस<br>६८. चिकू<br>६९. पपई<br>७०. काजू<br>७१. रामफळ<br>७२. द्राक्षे<br>७३. जर्दाळू | ७४. तंबाखू<br>७५. कॉफी<br>७६. चहा<br>७७. ताग<br>७८. विड्याची पाने<br>७९. ओवा<br>८०. अफू<br>८१. कोयनेल<br>८२. इतर | ८३. सुपारी<br>८४. वेलची<br>८५. मिरची<br>८६. आले<br>८७. काळी मिरी<br>८८. हळद<br>८९. बडीशेप<br>९०. धने<br>९१. जिरे<br>९२. मेथी<br>९३. लसूण<br>९४. चिंच | ९५. ऊस<br>९६. खजूर<br>९७. इतर | ९८. तिळ किंवा जिंगेली बिया<br>९९. जवस<br>१००. एरंडी<br>१०१. पांढरी मोहरी<br>१०२. सर्वसाधारण मोहरी<br>१०३. कारळा<br>१०४. भुईमूग<br>१०५. बाळंतशेप १०६. नारळ<br>१०७. करडई<br>१०८. कुसुंब |

| वर्ग नऊ<br>रंगद्रव्ये व चर्मशोधन द्रव्ये | वर्ग दहा<br>तंतू | वर्ग ११ व ११(अ)<br>संकीर्ण |
|---|---|---|
| १०९. नीळ<br>११०. इतर | १११. कापूस ११२. ताग<br>११३. मुंबईची भांग<br>११४. भांग<br>११५. रिहा (चायनाग्रास)<br>११६. काथ्या | ११७. बाभूळ<br>११८. कारळे<br>११९. पिल<br>१२०. हुंडी<br>१२१. इतर |

Dr. SANJAY KUNDETKAR, DY. COL

## ♦ तालुका नमुना-११: वेतन नोंदवही:

हा वार्षिक नमुना असून यात शेतमजूर व इतर कामगार/मजूर यांना दिलेल्या दैनिक व मासिक वेतनाच्या माहितीची नोंद तसेच तालुक्याच्या भागांमधील वेतनांच्या चढ-उताराचा तपशीलाबाबत यात नोंद केली जाते.

| तालुका नमुना-११<br>वेतन नोंदवही | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मासिक वेतने | | | | | | | |
| | अ | | ब | | क | | शेरा |
| | दिवस | महिना | दिवस | महिना | दिवस | महिना | |
| | रु. | पै. | रु. | पै. | रु. | पै. | |
| कुशल कामगार सुतार<br>• लोहार<br>• मोची | | | | | | | |
| सर्वसाधारण कामगार<br>• पुरुष<br>(१८ वर्षे वरील, धडधाकट)<br>• स्त्री<br>(१८ वर्षे वरील, धडधाकट) | | | | | | | |
| क्षेत्र कामगार<br>• पुरुष<br>(१८ वर्षे वरील, धडधाकट)<br>• स्त्री<br>(१८ वर्षे वरील, धडधाकट)<br>• मुलगा/ मुलगी<br>(१८ वर्षे वरील) | | | | | | | |
| दिनांक: | | | | | तहसिलदार, ता....., जि....... | | |

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

♦ <u>तालुका नमुना-१२: पर्जन्यमापन नोंदवही:</u>

पर्जन्यमापक जेथे उपलब्ध आहे त्या तालुक्यात ठेवण्यासाठी हा वार्षिक नमुना असून यात तालुक्यातील पर्जन्यमानाची नोंद करण्यात येते.

दररोज सकाळी ८.०० वाजता यात पर्जन्यमानाची नोंद घेण्यात याते. पाऊस पडला नसेल तर '०' अशी स्पष्ट नोंद करावी, ठिपके, रेष, कोरे ठेवणे असे प्रकार वापरू नये.

| <u>तालुका नमुना-१२: पर्जन्यमापन नोंदवही:</u> | | |
|---|---|---|
| महिना: | | तालुका: |
| वर्ष: | | जिल्हा: |
| दिनांक | पर्जन्यमान (मिलिमीटर) | शेरा |
| | | |
| | | |
| | | |
| • महिना अखेरपर्यंत:<br>• महिन्याची बेरीज<br>• मागील बेरीज<br>• जून एक पासूनची बेरीज<br>सही-<br>तहसिलदार, ता....., जि....... | | |

♦ <u>तालुका नमुना-१३: दैनिक भत्ता नोंदवही:</u>

हा सततचा दैनिक नमुना असून यात महसुली न्यायालयात बोलवलेल्या साक्षीदारांना दिला जाणारा दैनिक भत्ता, आणि खाजगी पक्षकाराने भत्त्यासाठी जमा केलेल्या रकमेची नोंद असते.

संपूर्ण राज्यात लागू असलेल्या मुंबई न्यायालय शुल्क अधिनियम १९५९, कलम ३२ अन्वये, उच्च न्यायालयाला दिवाणी आणि महसुली न्यायालयाने आदेशिका बजावणे व तिचे कार्यान्वयन करण्याबद्दल आकारण्याच्या फी बाबतचे नियम तयार करण्याची शक्ती प्रदान करण्यात आली आहे. या शक्तींचा वापर करून उच्च न्यायालयाने, दिवाणी नियमपुस्तिका खंड १ च्या प्रकरण २२ मध्ये आदेशिका फी चे नियम तयार केले असून ते उच्च न्यायालयाची अधिसूचना क्रमांक पी-६३२६/५६, दिनांक ३१.३.१९५९ अन्वये संपूर्ण राज्याला लागू केले असून त्यानुसार महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या उपबंधानुसार चौकशी करणाऱ्या महसूल अधिकाऱ्यांनी दिवाणी नियम पुस्तिकेच्या प्रकरण २२ मध्ये विहित केलेल्या प्रमाणे आदेशिका फी आकारण्याची तरतूद आहे. जर कोणत्याही रीतसर किंवा संक्षिप्त चौकशीच्यावेळी पक्षकाराने, साक्षीदारांच्या उपस्थितीची इच्छा व्यक्त केली तर दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ मध्ये विहीत केलेली कार्यपद्धती अनुसरावी अशी तरतूद महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६, कलम २३१ अन्वये करण्यात आलेली आहे.

VIJAY KUNDETKAR, Dy. Collector

दिवाणी न्यायालयात बोलविलेल्या साक्षीदारांना द्यावयाच्या भत्याबाबतचे नियम उच्च न्यायालयाने, दिवाणी नियम पुस्तिकेच्या खंड एक प्रकरण सातमध्ये तयार केले आहेत.

तालुका नमुना-१३
शासनाने साक्षीदार इत्यादींना दिलेला भत्ता इत्यादीचे व खाजगी पक्षकारांनी महसूल न्यायालयात व त्यासाठी निक्षिप्त केलेल्या रकमांचे दैनिक तपशीलवार पुस्तक

तालुका: जिल्हा:

| अ.क्र. | दिनांक | महसुली प्रकरण क्रमांक व न्यायालय | रक्कम निक्षिप्त करणाऱ्या पक्षकाराचे नाव | निक्षिप्त केलेली रक्कम | साक्षीदारांची किंवा फिर्यादीची नावे |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

| भत्ता | | | रेल्वे, बस, बोट किंवा गाडी इत्यादींचे भाडे | | | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| दिवस | दर | रक्कम | पासून | पर्यंत | रेल्वे, बस, बोट किंवा गाडी यापैकी कोणते वाहन | | |
| ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| | | | | | | | |

| एकूण | तहसीलदारची आद्याक्षरी | शेरा | आदात्याची सही किंवा अंगठा | शासनाने रक्कम दिली असल्यास स्तंभ (४) व (५) मध्ये कोणतीही नोंद करू नये. |
|---|---|---|---|---|
| १५ | १६ | १७ | १८ | |
| | | | | |

♦ <u>तालुका नमुना-१४: स्थायी अग्रिम नोंदवही:</u>

हा सततचा नमुना असून यात स्थायी अग्रिमाच्या संबंधातील जमा रकमा व खर्च यांची दैनिक नोंद असते. याबाबत महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम, १९६५ यामध्ये तपशिलवार माहिती नमूद आहे.

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| तालुका नमुना १४<br>स्थायी अग्रिमांच्या संबंधातील जमा रकमा व खर्च यांची नोंदवही | | | | | | |
| तालुका: | | | | जिल्हा: | | |
| रक्कम | कोणाकडून मिळाली | कशासाठी | कोणाला दिली | प्रमाणक क्रमांक | कशासाठी | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | |
| | | | | | | |
| महसूल | | दंडाधिकार विषयक साक्षीदार | तुरुंग | संकीर्ण व अग्रिमे | दैनिक बेरीज व शिल्लक | शेरा |
| ठराव बंद | प्रतिस्वाक्षरीत व लेखापरीक्षीत | | | | | |
| ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| | | | | | | |

♦ <u>तालुका नमुना-१५: तपासणी, शोध, नक्कल फी नोंदवही:</u>

हा वार्षिक नमुना असून यात नक्कल मिळण्यासाठी आलेल्या अर्जांची, अभिलेखातील कागदपत्रांची तपासणी, शोध, नक्कल यासाठी आकारण्यात आलेल्या फी यांची दैनिक नोंद असते. यात दररोज नोंद करावी. तपासणी, शोध, नक्कल फी यासाठी दररोज प्राप्त झालेल्या रकमेचा, पावत्यांवरून मेळ घेण्यात यावा. प्राप्त रक्कम विहित मुदतीत शासकीय कोषागारात भरणा झाल्याची खात्री करावी. यावर अव्वल कारकून, नायब तहसिलदार / तहसिलदारने स्वाक्षरी करावी.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| तालुका नमुना-१५<br>तपासणी, शोध, नक्कल फी नोंदवही | | | | |
| तालुका: | | | जिल्हा: | |
| दिनांक | अनुक्रमांक | अर्जदाराचे नाव | निक्षिप्त रक्कम | |
| | | | | |
| १ | २ | ३ | ४ | |
| | | | | |
| खर्ची टाकलेली रक्कम | | | | |
| तपासणी फी | शोध फी | नक्कल फी | कागदाचा खर्च | पोस्ट खर्च |
| ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | |
| परताव्याची रक्कम | स्तंभ (५) ते (१०) ची बेरीज | शेरा | | |
| १० | ११ | १२ | | |
| | | | | |

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

♦ <u>तालुका नमुना-१६: तालुका आदर्श तक्ता:</u>

हा वार्षिक नमुना असून तालुका आदर्श तक्ता आहे. महसूल अधिकारी आणि जनता यांच्यासाठी जमीन महसूल प्रशासन आणि सामान्य प्रशासन यासंबंधी आवश्यक संपूर्ण माहिती यात नमूद असते. तलाठ्यांकडील ग्राम आदर्श तक्त्यातून माहिती संकलीत करून तालुका आदर्श तक्ता बनविला जातो. जनतेच्या माहितीसाठी तालुका आदर्श तक्ता, तालुका कार्यालयात दर्शनी भागात लावला जातो. गाव पातळीवर काही बदल झाल्यास हा तक्ता अद्ययावत करावा.

तालुका आदर्श तक्ता

तालुका: जिल्हा:

१. वर्ष

२. तालुक्याचे नाव

३. क्षेत्र (चौरस किलोमीटरमध्ये)

४. लोकसंख्या पुरुष स्त्री

५. गावांची संख्या खरीप रब्बी वन ओसाड एकूण

६. मंडळांची संख्या मंडळ अधिकाऱ्यांची संख्या

७. साझ्यांची संख्या तलाठ्यांची संख्या

८. पोलीस पाटलाची संख्या

९. कोतवालांची संख्या

१०. खातेदारांची संख्या व त्यांच्या भोगवट्याखालील जमिनीचे क्षेत्र खातेदारांची संख्या

अ. दोन हेक्टरपेक्षा म्हणजेच पाच एकरपेक्षा कमी जमीन धारण करणारे

ब. दोन हेक्टरपेक्षा म्हणजेच पाच हेक्टरपेक्षा अधिक जमीन धारण करणारे

११. भूमिहीन शेतमजुरांची संख्या

१२. कारागिरांची संख्या

१३. एकूण क्षेत्र बिन दुमाला दुमाला एकूण

१४. लागवड योग्य जमिनीचे क्षेत्र खरीप रब्बी एकूण

१५. अकृषिक वापराखालील शेतजमिनीचे क्षेत्र

१६. सरकारी पडीत जमिनीचे क्षेत्र

१७. पडीक जमिनीचे क्षेत्र

१८. वन जमिनीचे क्षेत्र

SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

१९. कुरणाचे क्षेत्र

२०. पोटखराबा जमिनीचे क्षेत्र

२१. क्रिडांगणाच्या खालील जमीन

२२. अतिक्रमणाखालील जमीन

२३. महसूल माफ म्हणून किंवा विशेषरित्या
कम आकारी म्हणून प्रदान जमिनीचे क्षेत्र

२४. प्रमुख पिके जलसिंचीत क्षेत्र कोरडवाहू पीक इतर क्षेत्र
एकूण पिकाचे नाव

१ भात

२ खरीप ज्वारी

३ रब्बी ज्वारी

४. गहू

५ भुईमूग

६ ऊस

७ कापूस

८ इतर पिके

२५. जमीन महसुलाची (कृषिक) एकूण मागणी
नियत संकिर्ण एकूण मागील वर्षी केलेली वसुली- नियत संकिर्ण एकूण

२६. अकृषिक आकारणीची एकूण मागणी
मागील वर्षी केलेली वसुली

२७. इतर महसुली मागण्या मागील वर्षी केलेली वसुली

१ शिक्षण उपकर

२ पाटबंधारे विषयक येणे रकमा

३ इतर बाबी

२८. तगाई कर्जाची एकूण बाकी
मागील वर्षी केलेली तगाई कर्जाची वसुली

२९. सरासरी पर्जन्यमान

३०. पिण्याच्या पाण्याचा पुरवठाची साधने

३१. जलसिंचन विहिरींची संख्या
वापरात असलेले विहिरींची संख्या
वापरात नसलेल्या (नादुरुस्त) विहिरींची संख्या

३२. बागायत जमिनीचे क्षेत्र

३३. जलसिंचनाची साधने व
जलसिंचित क्षेत्र

SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

जलसिंचनाचे मार्ग व साधने — जल सिंचित क्षेत्र

१ कालवे
२ बांध
३ विहीरी
अ. मोटा
ब. तेल इंजिने
क. विद्युत मोटारी
ड. उद्धरण यंत्रे
इ. पंप संच
४. बुडकी
५. इतर

३४. गुरे व पशु यांची संख्या असलेली — शिंगें असलेली
शिंगें नसलेली

३५. सार्वजनिक व सहकारी संस्था
१ नगरपालिका
२ ग्रामपंचायत किंवा गट ग्रामपंचायत
३ न्याय पंचायत
४ पंचायत समितीच्या
५ पोलीस ठाणे (ठाणी)
६ डाक कार्यालय/ कार्यालये
७ प्राथमिक शाळा
८ दुय्यम शाळा
९ माध्यमिक शाळा
१० महाविद्यालय
११ सार्वजनिक दवाखाने
माणसांकरिता
पशुवैद्यकीय
१२ दळणवळणाची साधने
१३ सहकारी संस्था
१४ सहकारी कारखाने
१५ महिला मंडळे
१६ तरुण मंडळे (युवक क्लब)
१७ भजनी मंडळे
१८ तालीम संघ

SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

३६. अन्नधान्याचे रास्त भाव दुकानांची संख्या

......... रोजी असल्याप्रमाणे अन्नधान्याचा एकूण साठा

१ तांदूळ

२ ज्वारी

३ गहू

४ इतर

३८. बाजाराच्या ठिकाणांची नावे

३९. सार्वजनिक जत्रांच्या ठिकाणांची नावे

४०. खाद्य गृहांची (उपहारगृहांची) एकूण संख्या

४१. कुटुंबनियोजन केंद्रांची संख्या

४२. वर्षभरात पार पाडलेल्या कुटुंबनियोजन शस्त्रक्रियांची संख्या पुरुष स्त्रिया

४३. रस्त्यांचे निरनिराळे प्रकार व त्यांची लांबी (कि.मी.)

४४. रेल्वे मार्गाची लांबी (कि.मी.)

तहसिलदार

तालुका

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector